दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.८ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १६४ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 8 Febuary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 164 | Pages 4 | Rate 4 Rs

### भावनिक वातावरणातही राजकीय संयम राखावा

**मुंबई**–दहा वर्षांनंतर जिल्हा परिषद स्तरावर मतदान होत असल्याने मतदारांमध्ये आणि उमेदवारांमध्ये उत्साह दिसत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या निमित्ताने जिल्हा परिषदांमध्ये पुन्हा लोकशाहीची चक्रे फिरतील, असे ते म्हणाले. निवडणूक प्रक्रियेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन व्यक्त करत त्यांनी शांततेत मतदान पार पाडण्याचे आवाहन केले. एकूणच, सुनेत्रा पवारांच्या शपथविधीपासून विलीनीकरणाच्या चर्चांपर्यंत आणि अपघात चौकशीपर्यंत सर्व मुद्द्यांवर हसन मुश्रीफ यांनी स्पष्ट भूमिका मांडत सुरू असलेल्या वादांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. पक्षांतर्गत निर्णयांवर बाह्य टीका नको, चौकशीच्या निष्कर्षांवर विश्वास ठेवावा आणि भावनिक वातावरणातही राजकीय संयम राखावा, हा संदेश त्यांच्या वक्तव्यातून उमटला.

# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा ई-केवायसी पोर्टल पुन्हा सुरू

## ३१ मार्चपर्यंत दुरुस्तीची संधी; रखडलेले हप्ते लवकरच जमा होणार

### दुरुस्ती करण्याची अंतिम मुदत ३१ मार्चपर्यंत

**याची दखल घेत प्रशासनाने ई-केवायसी प्रक्रियेत बदल करण्याची पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून दिली आहे. ज्या महिलांनी माहिती भरताना चुकीचा पर्याय निवडला होता, त्यांना आता आपल्या अर्जात ऑनलाईन सुधारणा करता येणार आहे. ही दुरुस्ती करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली असून, यामुळे हजारो महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे आणि योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.**

### लाडक्या बहीणींचे २१०० रुपये करण्याचे महायुतीकडून आश्वासन

**दरम्यान, आता जानेवारी महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींना कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डिसेंबर महिन्याचा हप्ता हा १४ जानेवारी रोजी लाडक्या बहीणींच्या खात्यात जमा झाला होता. आता जानेवारीचा देखील त्याच दरम्यान फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेक ठिकाणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचार सभेत बोलताना लाडक्या बहीणींचे २१०० रुपये करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.**




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात अनेक लाडक्या बहिणींना पैसे मिळाले नसल्याने काही ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरताना अनेक महिलांना ई-केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. परंतु, आता या महिलंनया दिलासा मिळणार असल्याचे समोर आले आहे. महिला व बाल विकास विभागाने ई-केवायसीचे पोर्टल पुन्हा सुरू केले असून ई-केवायसी दुरुस्ती आता ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.लाडकी बहीण योजनेचे ई-केवायसी पोर्टल आजपासून पुन्हा एकदा सुरू करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसीचे पोर्टल बंद असल्याने अनेक महिलांचे पैसे थकले होते. यामुळे लाडक्या बहीणींनी राज्यातील अनेक भागांमध्ये आक्रोश व्यक्त करत मोर्चे काढले होते. याची गंभीर दखल घेत राज्य महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केलए आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.या त्रुटींमुळे लाभार्थी महिलांच्या पात्रतेची खात्री करण्यासाठी शासनाने २० जानेवारी रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, ही पडताळणी प्रक्रिया अधिक जलद आणि सुटसुटीत व्हावी, अशी मागणी लाभार्थी महिला आणि क्षेत्रीय कार्यालयांकडून सातत्याने केली जात होती. प्रत्यक्ष पडताळणीमध्ये येणाऱ्या अडचणी आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीनेच माहिती सुधारण्याची संधी देण्याची विनंती सरकारकडे करण्यात आली होती.

### ई-केवायसीत चुकीचा पर्याय निवडल्याने संभ्रम

**'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी द्वारे आधार प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र, ही प्रक्रिया पार पाडताना अनेक महिलांकडून कुटुंबातील सदस्यांच्या सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतनाबाबतचा पर्याय निवडताना तांत्रिक चूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी विभाग, मंडळ किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत नियमित/कंत्राटी कर्मचारी आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना चुकीचा पर्याय निवडल्या गेल्यामुळे अनेक पात्र महिलांच्या अर्जांबाबत संभ्रम निर्माण झाला होता.**

### सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय हा पक्षाचा

## राष्ट्रीय अध्यक्षपदही त्यांनीच सांभाळावे-भुजबळ यांनी मांडले मत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निर्णयावर सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. यावर आता मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, सोमवारी आणि मंगळवारी सुनेत्रा पवार या मुंबईत येणार आहेत. राष्ट्रीय अध्यक्षपद तुम्हीच सांभाळले पाहिजे हे आम्ही त्यांना सांगणार आहोत. राष्ट्रीय अध्यक्षपद हे त्यांना दिले पाहिजे हे आमच्या महिला पदाधिकारी देखील म्हणत आहेत. पक्षाने सुनेत्रा पावर यांना उपमुख्यमंत्री आणि नेता बनवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच हा एकता तटकरे यांचा निर्णय नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले. छगन भुजबळ म्हणाले, बाळासाहेब ठाकरे यांनी मला महापौर केलं होतं. शिवसेनेत असताना दोन वेळा मी महापौर झालो होतो. महापौर आणि आमदार दोन्ही होतो. राजकारण हे बदलत असतं, मुख्यमंत्री बदलतात प्रधानमंत्री बदलतात, महापौर बदलले असतील. निवडून आलेले लोक आहेत त्यांच्याकडे काय पुरावे आहेत. यांवर काहीच बोललं न बरं. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय हा सर्व पक्षाचा होता. एकटा तटकरे यांचा निर्णय नव्हता. सारखं सारखं तुम्ही देखील विचारता. पक्षाने उपमुख्यमंत्री आणि नेता बनवण्याचा निर्णय घेतला आहे असे भुजबळ म्हणाले.दरम्यान, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या नेत्यांनी दावा केला आहे की अजित पवारांची दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची इच्छा होती. तशी चर्चा देखील झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे अजित पवार गटाचे नेत्यांनी अशी कुठलीही चर्चा झाली नसल्याचे म्हटले आहे. या सगळ्यावर आता शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे.जितेंद्र आव्हाड म्हणाले, मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की, विलीनीकरणाच्या कुठल्याही चर्चेत मला सहभागी करून घेतले नव्हते. मी त्या चर्चेचा भाग नव्हतो. त्यामुळे विलीनीकरणाबाबत मला काहीही माहित नाही. मी कुठल्याही बैठकीत सामील नसेल तर मला कुठलीही माहिती देण्यात आली नाही. हे कृपया टीव्हीवर दाखवा, असे आव्हाड म्हणाले.

## स्वीकृत नगरसेवकावरून मनसेचा ठाकरेंना अल्टिमेटम:तीनपैकी एक जागा मनसेला द्या

### जागावाटपात शांत राहिलेल्या मनसेची ठाम मागणी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**



मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीवरून नवा राजकीय पेच निर्माण झाला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या तीन स्वीकृत नगरसेवकांपैकी एक जागा मनसेला द्यावी, अशी आग्रही भूमिका मनसेच्या काही नेत्यांकडून घेतली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या मागणीमुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे यांच्यातील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काही दिवसांत याबाबत निर्णायक घडामोडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.महापालिका निवडणुकीत जागावाटपाच्या वेळी मनसेने तुलनेने कमी जागांवर समाधान मानत ठाकरेंच्या शिवसेनेला अधिकाधिक जागा लढवण्यासाठी मोकळीक दिली होती. त्या वेळी मनसेकडून कोणताही तणाव किंवा अडथळा निर्माण करण्यात आला नव्हता. त्यामुळे आता स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीच्या वेळी तरी ठाकरेंच्या शिवसेनेने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. तीन स्वीकृत नगरसेवकांपैकी दोन ठाकरेंच्या शिवसेनेचे आणि एक मनसेचा असावा, असा प्रस्ताव चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे.याच पार्श्वभूमीवर मनसेच्या बैठकीत विविध पर्यायांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. सत्ताधारी पक्षांकडूनही मनसेला काही प्रस्ताव आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे केवळ ठाकरेंच्या शिवसेनेसोबत चर्चा करून निर्णय घ्यायचा की इतर पर्यायांचाही विचार करायचा, यावर मनसेमध्ये मतमंथन सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मुंबई महापालिकेत निवडून आलेल्या सहा नगरसेवकांना संधी मिळावी, त्यासोबत स्वीकृत नगरसेवकपदही मिळावे, अशी मनसेची भूमिका असल्याचे सांगितले जाते.दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहात यंदा प्रथमच १० स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार आहे. २०२३ साली विधान परिषदेत मंजूर झालेल्या विधेयकानुसार स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाचवरून दहावर वाढवण्यात आली आहे. त्यामुळे विविध पक्षांना स्वीकृत नगरसेवक देताना नव्या समीकरणांचा विचार करावा लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर मनसेनेही आपला दावा ठामपणे मांडण्यास सुरुवात केल्याचे दिसते.महापालिकेतील संख्याबळ पाहता भाजपकडे २२७ पैकी ८९ नगरसेवक आहेत. त्यामुळे दहा स्वीकृत नगरसेवकांपैकी किमान चार सदस्य भाजपच्या वाट्याला जातील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. भाजपनंतर सर्वाधिक संख्याबळ ठाकरेंच्या शिवसेनेकडे असल्याने त्यांनाही लक्षणीय प्रमाणात स्वीकृत नगरसेवक मिळण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला तसेच कॉंग्रेसलाही स्वीकृत नगरसेवक मिळणार असल्याचे संकेत आहेत.

# डाब येथे याहामोगी पूजन नियोजन बैठक

## तीन दिवसीय उत्सव ; हजारो भाविक लावणार हजेरी

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

अक्कलकुवा तालुक्यातील डाब देवगोई येथे आदिवासी समुदायाची कुलदैवत याहामोगी मातेच्या आगामी यात्रोत्सव आणि पूजनाच्या नियोजनासाठी सातपुडा परिसरातील नागरिकांची बैठक नुकतीच पार पहली. यावेळी १४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस सरपंच आकाश वसावे, देवगोवी ट्रस्टचे अध्यक्ष धनसिंग वसावे, पूजरा सामा पाडवी, कारभारी रामजी राऊत,पुजारा मोग्या वसावे, आदिवासी एकता परिषदेचे सी.के.पाडवी,करमसिंग पाडवी,ॲड.अभिजित वसावे यांच्यासह याहामोगीचे सेवेकरी उपस्थित होते. कार्यक्रमानुसार १४ फेब्रुवारीला याहामोगीचे स्थानविधी, १५ फेब्रुवारीला सामूहिक पूजा, तर १६ फेब्रुवारीला पावरा समाजाकडून 'मानाची पूजा' होणार असल्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. प्रसंग आदिवासी समाजातील सण-उत्सव हे निसर्गाशी निगडित असून,निसर्गपूजन व सृष्टीसंवर्धनाचा संदेश देणारे आहेत.सृष्टीतील पहिला जीव अवतरण पावलेली ही पत्रिक भूमी आदिवासी समाजाच्या आस्थेचे केंद्र मानली जाते असे सरपंच आकाश वसावे यांनी सांगितले. सी.के.पाडवी यांनी, आदिवासी इतिहासकारांच्या मजे, सृष्टीतील पहिला जीव 'कोलपासा' याचा अवतार येथे झाला. कोलपासाचा परिवार मेघराया व हुर्रिंगपासा असा होता.प्राचीन काळी देवगोवी येथे 'मोलहोबाय'म्हणजेच देवांची सभा भरत असे. हे स्थळ देवगोवी येथील 'मोलाय ईअडी' म्हणून ओळखले जाते.आजही त्या मंदिर परिसरात हरडा वृक्ष साक्षीदार म्हणून उभा आहे. असे सांगून नियोजनावर चर्चा केली.



**काय आहे डाब देवगोवीचे महत्त्व** देवगोवी येथे निमाडपाटी,आंबुडापाटी,दुबलापाटी ,देहपाटी, मावचारपाटी, नोयरापाटी व नाहालपाटी या प्रदेशातील देवीदेवतांची वर्षातून एकदा सभा भरत असे. सभेत प्रजेच्या हिताचे निर्णय घेऊन प्रत्येक देवता आपापल्या स्थानकांकडे स्नस्थान करीत असत.त्यामुळे या स्थळास आदिवासी बोलीभाषेत 'देवगोया' म्हणजेच 'देवगेले' असा अर्थ प्राप्त झाला.देवगोवी ही देवबावाशाची राणी होती, तर मोलाय ईअडी (मोलहोबाय) ही राजा गिंबल्या याची राणी होती. मेघरायाचा पुत्र। राजा गिंबल्या होता. मौखिक परंपरेनुसार, एकदा धरतीवर भीषण दुष्काळ पडला असता मानव, पशुपक्षी व वृक्षसृष्टी संकटात सापडली होती. त्यामुळे राजा गिंबल्या यांनी सात समुद्र फिरून धरतीवर पाऊस पडला. त्यामुळे गिंबल्या राजाला सृष्टीची फलधारणा करणारा देव मानले जाते. त्यांच्या पौर्णिमेला आजही दांडा गाडण्याची प्रथा प्रचलित आहे.

# संपादकीय

## आडवा टँकर



१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही?

आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे.विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई – पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे.

मुंबई – पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही.पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनःपुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे.

मुंबई – पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे.हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भारताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ५० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ५० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी ॲक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी. हा महामार्ग ज्या सरकारी उपक्रमाच्या मालकीचा आहे, ते राज्य रस्ते विकास महामंडळ याबाबत अधिक जागरूक असायला हवं. दुर्घटना घडून २४ तास उलटून गेल्यानंतर आपल्या हालचालींची माहिती चार–पाचच काय, देशातल्या सगळ्या भाषांत दिली, तरी या महामंडळाची कार्यक्षमता त्याने पटवून देता येणार नाही!

प्रोपेनसारखा १७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? या संदर्भातल्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदांवर, फायलीत गुंडाळून ठेवण्यासाठीच आहेत का? रस्त्यात आडव्या झालेल्या या टँकरमुळे २०–२२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. अनेकांच्या आयुष्याची खोटी झाली. मालाचं प्रचंड नुकसान झालं. महानगरांची जीवनावश्यक पुरवठ्याची साखळी तुटली. ध्यानीमनी नसताना रस्त्यात अडकलेल्यांची अक्षरशः दैना झाली. याची नुकसानभरपाई कोणी कोणाला द्यायची? ज्यांनी अपघाताची कल्पना देऊन वेळीच वाहतूक रोखली नाही, त्यांच्या बेजबाबदारपणाची शिक्षा काय ठरवायची? निदान मुंबई, पुण्यातल्या जनतेला तरी आज हेच प्रश्न छळत आहेत. त्यांची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तेवढं बरं.

# विक्रांत पाटील,महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते प्रॉपर्टी प्रदर्शनाचे उद्घाटन

## सिडकोने घरे विकताना गरिबांचा विचार करावा : महेंद्रशेठ घरत





**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

आमदार विक्रांत पाटील आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते नवव्या प्रॉपर्टी प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (ता. ६) खांदा रेल्वेस्थानकाशेजारी झाले. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे स्वागत जितू जगवाणी यांनी केले. तसेच प्रदर्शन पाहिल्यानंतर त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, येत्या काळात रायगड जिल्हा विकासाचे केंद्रबिंदू असेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अटल सेतूमुळे रायगड जिल्ह्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर होईल. उलवे, पनवेल, खारघर, पुष्पकनगर येथील घरांच्या किमती येत्या काळात गगनाला भिडतील. येथे गरिबांना घर घेणे अशक्य होईल. त्यामुळे सिडकोने घरे बांधताना आणि विकतानाही गरिबांचा विचार करायला हवा. कारण जमीन सिडकोचीच असते. त्यामुळे अल्पदरात सर्वसामान्यांना सिडकोने घरे बांधून देणे सहजशक्य आहे. क्रेडाई रायगडच्या माध्यमातून होत असलेले प्रॉपर्टी प्रदर्शन लक्षणीय आहे. यात सर्व प्रकारच्या ग्राहकांचा विचार आहे. विशेषतः थर्ड जनरेशनचा अधिक विचार बांधकाम व्यावसायिकांनी केला आहे. त्यामुळे ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल. बांधकाम व्यावसायिकांनी भविष्यकाळातील घरांची मागणी लक्षात घेऊन प्रकल्प उभारले आहेत. त्याबद्द सर्व बांधकाम व्यावसायिकांचे अभिनंदन, खूप सुंदर प्रदर्शन आहे.यावेळी आमदार विक्रांत पाटील म्हणाले, पनवेल शहर जोमाने विकसित होत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे खूप संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा फायदा बांधकाम व्यावसायिकांना निश्चितच होईल. विकासाचा वेग वाढल्यामुळे घरांची मागणी वाढेल. येत्या काळात सर्वसामान्य नागरिकांना घर घेणे अशक्य होईल. प्रॉपर्टी प्रदर्शनामुळे घराची निवड करताना अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहकांना निश्चितच त्याचा फायदा होईल.यावेळी जळगावचे माजी आमदार गुरुमुख जगवाणी आणि क्रेडाई बीएएनएम रायगड बिल्डर वेल्फेअर असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. हे प्रदर्शन चार दिवस चालणार आहे. त्यांनी ग्राहकांचे आणि मान्यवरांचे स्वागत केले.

# नागरिक केंद्रित कार्यपद्धतीला प्राधान्य देत कामकाजाची नव्याने सुरुवात





**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेचा उपमहापौर म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी नागरिक केंद्रित कार्यपद्धतीला प्राधान्य देत कामकाजाची नव्याने सुरुवात करण्यात आली.पदभार स्वीकारताच शहरातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या, तक्रारी व नागरी सुविधांबाबतच्या अपेक्षा जाणून घेतल्या. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना संवेदनशीलतेने समजून घेऊन, त्यावर तातडीने व परिणामकारक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन देखील दिले.लोकप्रतिनिधी म्हणून जनतेशी थेट संपर्क, पारदर्शक निर्णय प्रक्रिया आणि वेळेत समस्या निवारण हीच माझ्या कार्यपद्धतीची प्रमुख सूत्रे राहतील. नवी मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना अधिक सक्षम, सुरक्षित व सोयीस्कर नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने कार्य करण्याचा माझा संकल्प राहील अशी भावना उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केली.नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरेल असे लोकाभिमुख, उत्तरदायी आणि गतिमान प्रशासन देण्याचा हा प्रारंभ असून, पुढील काळातही जनतेच्या सहभागातून शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिलांनी वाहिली अजितदादाना श्रद्धांजली



**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महिला विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने नुकतीच प्रदेश कार्यालयात आज श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या श्रद्धांजली सभेस मुंबई राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा आरती साळवी, मुंबईतील सर्व महाराष्ट्र, मुंबई,जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, वॉर्ड अध्यक्ष,व मुंबई कमिटी, जिल्हा कमिटी, तालुका कमिटी ,वार्डाची कमिटी ,पदाधिकारी सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.

# आम्ही बॅनर घेऊन गेलो होतो, हत्यार नाही भाजपच्या आरोपांवर गायकवाडांचा पलटवार

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संसदेत विरोधकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. बुधवारी संध्याकाळी ५ वाजता जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरू झाले, तेव्हा विरोधी पक्षाच्या महिला खासदारांनी सत्ताधारी नेत्यांच्या खुर्च्यांना घेराव घातला. यामध्ये पंतप्रधान मोदींच्या खुर्चीचाही समावेश होता. महिला खासदारांच्या हातात मोठे बॅनर होते, ज्यावर लिहिले होते – जे योग्य आहे, ते करा. यावेळी मोदी त्यांच्या खुर्चीवर नव्हते. परंतु, या झालेल्या गोंधळामुळे अध्यक्षांनी कामकाज तहकूब केलए होते. मंगलबवारी झालेल्या गोंधळानंतर ८ विरोधी खासदारांच्या निलंबनाच्या निषेधार्थ आज पुन्हा गोंधळ झाला होता. परंतु, यावरून थेट पंतप्रधानांवर हल्ला करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला आहे.काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी संसदेत झालेल्या गोंधळावर प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, आमची अपेक्षा आहे की अध्यक्षांनी निष्पक्षपणे काम करत आम्हाला न्याय द्यावा. विरोधी पक्षातले आहेत, त्यांना बोलू द्यायचे नाही. सत्ताधारी पक्षातले जे आहेत ते अश्लील बोलतात तरी त्यांना बोलू द्यायचे, ही भूमिका योग्य नाही. निशिकांत दुबे यांनी महिलांचा अपमान केला आहे आणि अश्लील बोलले आहेत.



जेव्हा विरोधी महिला खासदार पंतप्रधान मोदींच्या खुर्चीजवळ गेले तेव्हा निशिकांत दुबे होते का? असा प्रश्न विचारला असता वर्षा गायकवाड यांनी हो म्हटले. पुढे त्या म्हणाल्या, आम्ही जिथे कुठे बसलो आहोत, त्याचा अधिकार आम्हाला संविधानाने दिला आहे. लोकशाहीने दिलेल्या अधिकारांचा आम्ही वापर करू शकतो, संवैधानिक हत्याराचा आम्ही वापर करू शकतो. आम्ही बॅनर घेऊन उभे होतो. बॅनर घेऊन उभे होतो तर यायचे होते, आम्ही काय हत्यार घेऊन उभे होतो का मारायला? असा सवाल गायकवाड यांनी उपस्थित केला.भाजपच्या नेत्यांनी दावा केला की हातात काचेच्या बांगड्या होत्या, हत्यार म्हणून वापरण्यासाठी. त्यावर वर्षा गायकवाड म्हणाल्या, हातात बांगड्याच नाहीत, लग्नापासून घातल्या नाहीत. मला एक सांगा, ज्या महिला काचेच्या बांगड्या घालतात, त्यांचा मी सन्मान करते. महिला हातात बांगड्या घालतात, पण त्या बांगड्यांचा अर्थ असा होत नाही की ते मारण्यासाठी घालतात. ते त्यांचं सौभाग्याचे लेणं म्हणून घालतात.आमचे म्हणणे एकच आहे की एक व्यक्ती सातत्याने उठणार आणि संसदेच्या पूर्ण प्रणालीला बाजूला ठेऊन पूर्णपणे वेगळे काहीतरी बोलणार, बेजबाबदार आणि अश्लील बोलणं असतं त्यांचं आणि अशा व्यक्तीचे पुस्तक चालते, त्याचे रेफरन्स चालते आणि विरोधी पक्ष नेता राहुल गांधीजी जर त्या वेळेला बोलतात, चीनच्या घुसखोरीबद्दल तर ते तुम्हाला चालत नाही? आता आज त्यांनी कर नरेटीव्ह सेट केला की विरोधी महिला खासदार मारायला आल्या. खोटे बोला पण रेटून बोला याचे दुसरे नाव भाजप आहे, अशी टीका वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

# अजितदादांसारखा 'दादा' महाराष्ट्राला पून्हा मिळणे शक्य नाही घारे भावूक,अस्थिकलशाच्या दर्शनाला कर्जतची जनता लोटली





**दैनिक वादळ वार्ता**
**पनवेल । प्रतिनिधी**

अजितदादांचे नेतृत्व, वक्तृत्व आणि कर्तृत्व महाराष्ट्रात अव्वल होते. दादांच्या जाण्याने महाराष्ट्रात पोकळी निर्माण झाली आहे, दादांच्या सारखा नेता महाष्ट्राला पुन्हा मिळणे शक्य नाही, असे अजितदादांचे कर्तृत्व होते, अशा भावना व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे २८ रोजी बारामतीत विमान अपघातात निधन झाले . राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राज्यभरात अजित पवार यांचे अस्थि कलश सर्वसामान्य जनतेच्या दर्शनासाठी फिरवले जात आहेत. अजित पवार यांचा अस्थिकलश ३ जानेवारी रोजी कर्जत शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात दर्शनासाठी आणण्यात आल्या. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर भाऊ घारे, तसेच पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी अजितदादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. या वेळी शहरात शोकाकुल वातावरण होते. मोठ्या संख्येने लोक अस्थिकलशाचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते. नागरिकांनी शांततेत अजितदादांच्या अस्थींचे दर्शन घेत अजितदादांना अखेरचा निरोप दिला. यावेळी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते.यावेळी बोलताना घारे म्हणाले, अजितदादा यांच्यासारखे नेतृत्व आपल्यातून निघून जाणे अत्यंत दुःखद आहे. दादांच्या जाण्याने आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वच कार्यकर्ते शोकसागरात बुडाले आहेत. अजितदादांच्या जाण्याने आपल्या सर्वांच्या डोक्यावरील छत्र हरपले, अशी भावना निर्माण झाली. त्यांच्या निधनाने सर्वांना मोठा धक्का बसला आहे.


अजितदादांच्या जाण्याने मोठा धक्का महाराष्ट्राला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सामान्य कार्यकर्त्याला देखील बसला. अशा कठीण प्रंसगात सुनेत्रा वहिनी पवार यांनी पक्षाला स्थिर ठेवलं पाहिजे, यासाठी पक्षाने त्यांच्या हाती उपमुख्यमंत्रीपदाची आणि पक्षाची धुरा दिली. अत्यंत कठीण प्रसंगात त्यांनी धैर्य दाखवत ही धूरा आपल्या हातात घेतली. अशा कठीण प्रसंगात वहिणींनी पक्षातील सामान्य कार्यकर्त्याला आधार दिला, असे सुधाकर घारे यावेळी म्हणाले.

# नांदेडमध्ये प्रथमच महिलांसाठी होम मिनिस्टर ५ पैठणी २० शिफॉन साड्या जिंकण्याची सुवर्णसंधी

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी कुबेरनगरी मौजे लोंढेसांगवी प्रस्तुत नरेंद्र-देवेंद्र महोत्सव आयोजित करण्यात आला असून, यावर्षी या महोत्सवात पहिल्यांदाच महिलांसाठी 'होम मिनिस्टर' हा खास कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत विविध मनोरंजक खेळांमधून विजेत्या पाच महिलांना 'लालपोतू कलेक्शन'तर्फे पैठणी साडी, तर उपविजेत्या २० महिलांना ऑरगंज्या साडी देण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी व संयोजक धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

नरेंद्र-देवेंद्र महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मराठी हास्यदरबार कै. चंद्रभागा केरबाजी गंजेवार नगरी, नवा मोंढा मैदान, नांदेड येथे रंगणार असून, यामध्ये चला हवा येऊ द्या फेम मिमिक्री किंग सतीश कासेवार यांचा बहुचर्चित 'होम मिनिस्टर' कार्यक्रम होणार आहे. सर्वसाधारणपणे या कार्यक्रमात एकच पैठणी पारितोषिक दिले जाते; मात्र नांदेडमध्ये पहिल्यांदाच पाच पैठणी व वीस ऑरगंज्या साड्या पारितोषिक स्वरूपात देण्यात येणार आहेत.

'होम मिनिस्टर' कार्यक्रमात महिलांशी संवाद साधत विविध मनोरंजक खेळ घेतले जातात. महिलांची कल्पकता, कौशल्य आणि आत्मविश्वास यांना या मंचावर व्यासपीठ मिळते. उखाणे, विनोदी संवाद आणि हास्याचे क्षण उपस्थितांचे भरपूर मनोरंजन करतात. तळ्यात-मळ्यात सारख्या खेळांमधून महिलांची चपळता तपासली जाते, तर संगीतावर आधारित गाणे ओळखा हा खेळ सर्वांच्याच विशेष पसंतीस उतरतो. विनोदी उखाणे सादर करणाऱ्या सौभाग्यवतींना विशेष पारितोषिकेही दिली जाणार आहेत. या कार्यक्रमामुळे महिलांच्या आयुष्यात उत्सवाचा आनंद अधिकच द्विगुणित होतो.

याशिवाय, महोत्सवात वेळेवर उपस्थित राहणाऱ्या दहा रसिकांना भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्यातर्फे दहा कलर टीव्ही भेट दिले जाणार आहेत. त्यामुळे महिलांनाही कलर टीव्ही जिंकण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवात देशातील नामवंत हास्यकवी व हास्यकलाकार सादरीकरण करणार असल्याने, तब्बल पाच तासांचा कार्यक्रम कसा संपतो हे रसिकांना कळतही नाही.

शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी पहिल्या दिवशी चौदावा मराठी हास्य दरबार भरविण्यात येणार आहे. या हास्य दरबारात स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी, झी हास्य सम्राट सिद्धार्थ खिल्लारे तसेच लोकप्रिय शाहीर रमेश गिरी हे आपल्या विनोदी सादरीकरणातून रसिकांचे भरभरून मनोरंजन करणार आहेत.याच दिवशी रमेश पारसेवार, ॲड. गजानन पिंपरखेडे, रत्नाकर वाघमारे व गंगाप्रसाद तोष्णीवाल यांना नांदेड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तर सुधाकर पत्रभूषण पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये पन्नालाल शर्मा, अभय कुळकजाईकर, चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे व रामेश्वर काकडे यांचा समावेश आहे.

रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी चोवीसावे अखिल भारतीय विराट कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कविसंमेलनात मेरठ (उत्तर प्रदेश) येथील हास्य संचालक व क्रांती कवी सौरभ जैन सुमन, जबलपूर (मध्य प्रदेश) येथील हास्य गीतकार सुदीप भोला, भिलवाडा (राजस्थान) येथील हास्य व्यंग्य कवी दीपक पारेख, मैनपुरी (उत्तर प्रदेश) येथील वीर रस कवी डॉ. मनोज चौहान, सुरत (गुजरात) येथील शृंगार रसाच्या कवयित्री सोनल जैन तसेच दिल्लीच्या वीर रस कवयित्री नेहा शर्मा 'नमन' यांचा सहभाग असणार आहे. याच कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

नांदेडमध्ये पहिल्यांदाच भव्य स्वरूपात होणाऱ्या या 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाला महिलांनी व मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यास, दरवर्षी नरेंद्र-देवेंद्र महोत्सवात हा कार्यक्रम नियमितपणे समाविष्ट केला जाईल, अशी माहिती भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवप्रसाद राठी व भाजपा जिल्हा सरचिटणीस ड. दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

# नांदेडमध्ये भाजपचा इतिहास; कविता मुळे ठरणार पहिल्या भाजप महापौर,दीपकसिंह रावत उपमहापौर

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने इतिहास रचत पहिल्यांदाच महापौरपदावर आपला झेंडा फडकाविला आहे.भाजपच्या कविता मुळे यांची महापौरपदी निवड निश्चित झाली असून उपमहापौर पदी दीपकसिंह रावत यांची निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपला मिळालेल्या स्पष्ट बहुमतामुळे या दोन्ही पदांवरील निवड आता केवळ औपचारिक घोषणेस शिल्लक राहिली आहे.






महापौर व उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया गुरुवार,दि.५ फेब्रुवारीपासून सुरू झाली होती.भाजपकडून महापौरपदासाठी कविता मुळे तर उपमहापौर पदासाठी दीपकसिंह रावत यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत.नांदेड महानगरपालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्याने या दोन्ही पदांवर भाजपचाच उमेदवार विजयी होणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे.महापौरपदी निवड निश्चित झालेल्या कविता मुळे या प्रभाग क्रमांक २ (तरोडा बु.) येथून भाजपच्या तिकीटावर विजयी झाल्या आहेत.तर उपमहापौर पदी निवड निश्चित असलेले दीपकसिंह रावत हे प्रभाग क्रमांक १६ वजीराबाद/गाडीपुरा येथून भाजपचे नगरसेवक आहेत.

महानगरपालिकेच्या महापौरपदाची निवड प्रक्रिया प्रशासनाच्या देखरेखीखाली पार पडणार असून, दि.१० फेब्रुवारी रोजी विशेष सर्वसाधारण सभेत महापौर व उपमहापौरांची अधिकृत निवड केली जाणार आहे.महापौरपदी कविता मुळे आणि उपमहापौर पदी दीपकसिंह रावत यांच्या नावाची औपचारिक घोषणा याच दिवशी होणार आहे.

महानगरपालिका निवडणुकीत भाजपला ४५ जागांवर विजय मिळाला असून,शिवसेनेचे पाठिंबा जाहीर झालेले ४ सदस्य भाजपसोबत आल्याने महायुतीची सदस्य संख्या ४९ वर पोहोचली आहे. दुसरीकडे एमआयएमने १४ जागा मिळवत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे. काँग्रेसला १० तर वंचित बहुजन आघाडीला ५ जागा मिळाल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) दोन व अपक्ष उमेदवाराला एक जागा मिळाली आहे.

दरम्यान,भाजप प्रदेश कोअर कमिटीच्या बैठकीत महापौरपदासाठी चार नावे चर्चेत होती.त्यामध्ये कविता मुळे,शांभवी साले,सुदर्शना खामणे,ज्योती कल्याणकर व वैशाली देशमुख यांचा समावेश होता.अखेर कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

नांदेड महानगरपालिकेत पहिल्यांदाच भाजपचा महापौर होणार असल्याने शहराच्या राजकारणात नवे पर्व सुरू झाले आहे.भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून,आगामी काळात विकासाभिमुख कारभाराला प्राधान्य दिले जाईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

# आपल्या जगण्याचे मूलभूत सूत्र आहे राजकारण, धावपळ, साध्य, साधन आणि फलश्रुती

दैनिक वादळ वार्ता
**कुंडलवाडी । प्रतिनिधी**

माणूस जन्माला येतो तसा त्याचा अंत देखील ठरलेला असतो. सर्व प्राणीमात्रांना हा निसर्गाचा नियम लागू आहे. बुद्धाने उत्पत्ती, स्थिती आणि लय असे तत्वज्ञान मांडलेले आहे. ज्याप्रमाणे आंब्याला मोहोर येतो. नंतर कैरी जन्म घेते, ही झाली उत्पत्ती, कैरी मोठी होत जाते म्हणजे जेवढे तिचे आयुष्य असते तिथपर्यंत तिचा मोठे होण्याचा प्रवास असतो ही झाली स्थिती. त्यानंतर ती पिकते त्यास आंबा म्हणतात. तो गळून पडतो म्हणजेच त्याचा लय होतो. हेच सूत्र मनुष्यासह सर्व प्राणीमात्रांना लागू पडणारे आहे. मात्र माणसाला निसर्गाकडून बुद्धीचे वरदान लाभल्यामुळे तो जसा जसा उन्नत होत गेला तसा उपभोगवादी होत गेला, त्यातून तो निसर्गाचा शोषक बनला, कुठल्याही क्षेत्रात त्याचे जीवन व्यतीत होत असले तरी त्याची महत्त्वकांक्षा सतत वाढत जाते हे आजच्या जगण्याचे सूत्र झालेले आहे. त्यासाठी तो स्पर्धा करतो, ती स्पर्धा जीवघेणी असते त्याचाही विचार होत नाही. हे सर्व कशासाठी आपण करीत आहोत असाही ग्रश्न त्याला पडत नाही. त्यामुळे त्याच्यातील जीवन समजून घेण्याचे अज्ञान आणि सोबतच अहंकार वाढत जातो. पुढे असे एक वळण येथे की त्या वळणावर तो अस्तित्वहीन होतो आणि इतिहास जमा देखील होतो. त्यातल्या त्यात राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या लोकांच्या संदर्भात होणारी धावपळ जीवघेणी ठरते हे अनेक वेळा सिद्ध झालेले आहे.

अलीकडच्या काळात सत्ता स्पर्धा खूपच वाढल्यामुळे आणि त्यातील नैष्ठिक मूल्ये अस्तित्वहीन झाल्यामुळे महत्वाकांक्षी यश पदरात पाडून घेण्यासाठी राजकीय क्षेत्रातील लोक आपले सारे काही पणाला लावताना दिसतात. त्यासाठी प्रचंड धावपळ करताना दिसतात. त्यात त्यांचे घात होतात, अपघात होतात आणि त्यामुळे कुटुंबाचे, समाजाचे, राज्याचे आणि पर्यायाने देशाचे नुकसान होते याचा विचार अलीकडच्या काळात होत नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल. बऱ्याच वेळेला आपल्यात तुडुंब भरलेला अहंकार देखील रोजच्या जगण्यात आडवा येतो ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही. म्हणूनच बुद्धाचे उत्पत्ती स्थिती आणि लय हे तत्व फक्त कागदावरचे नाही, ते केवळ तत्व नसून आपल्या जगण्याचे सूत्र आहे. मूलभूत सूत्र आहे. सामान्य माणसाचे याबाबतचे आकलन आपण समजू शकतो. कारण तो रोजच्या धचाडग्यात अडकून जगण्यासाठीचे जे प्रयत्न करतो तेच त्याच्यासाठी जीवनमूल्य असते. त्याच्या पलीकडे त्याची झेप नसते. जन्म घेणे, जगणे, उपभोग घेणे, परिवार तयार करणे, त्याचे पोषण करणे, त्यांच्या पुढच्या जगण्याची व्यवस्था करणे पात सामान्य माणूस पूर्णपणे गढून गेलेला असतो, त्याचे आकलन तात्विक पातळीवर येत नाही. सध्या तशी व्यवस्था आणि मानसिकता आपल्या प्रत्येक समाजात आहे.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक ३२ तास ठप्प;राज ठाकरेंचा संताप

## वसूल करण्यात आलेला टोल परत करावा,सरकारकडे थेट मागणी




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर ज्वलनशील रसायन वाहून नेणारा टँकर मंगळवारी संध्याकाळी पलटी झाल्याने अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली. या अपघातानंतर ३२ तास महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत राहिली. अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. रात्रीच्या अंधारात तासन्तास न हलणारी वाहनं, रडणारी लहान मुलं, खाण्यापिण्याची गैरसोय आणि पाण्याचाही तुटवडा, या सगळ्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत हजारो वाहनचालक आणि प्रवासी महामार्गावर अडकून पडले होते.

या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरून सरकारवर टीका केली. अर्थसंकल्पात मुंबई-पुणे हायस्पीड ट्रेनची घोषणा करण्यात आली असली, तरी त्याआधी सध्याचा प्रवास सुरळीत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या काळात प्रवाशांकडून वसूल करण्यात आलेला टोल सरकारने परत करावा, अशी ठाम मागणीही त्यांनी केली. मूलभूत सुविधा न देता टोल वसूल करणे योग्य नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## धान खरेदीतील गंभीर अनियमिततेवर मंत्र्यांची कठोर भूमिका

# आरमोरी सहकारी खरेदी विक्री संस्था र न ६४० चा गोडाऊन एसडीएम ने केले सील

दैनिक वादळ वार्ता
**देसाईगंज । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात सहपालकमंत्री ड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा पणन विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यात सुरू असलेल्या धान खरेदी केंद्रांवरील अनियमिततेचा गंभीर मुद्दा आमदार रामदास मसराम यांच्या वतीने उपस्थित करण्यात आला.




आरमोरी सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्था र.नं. ६४० अंतर्गत फरी येथे सुरू असलेल्या धान खरेदी केंद्रावर मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींमध्ये शेतकऱ्यांकडून प्रत्येकी १०० रुपयांची अनाधिकृत पावती घेणे, शासनाने निश्चित केलेल्या ४०.६०० किलो मर्यादेपेक्षा जास्त म्हणजेच ४१.६०० किलो धान खरेदी करणे, नोंदणीप्रमाणे खरेदी न करणे तसेच हमालाना शासकीय हमाली न देणे अशा गंभीर बाबींचा समावेश होता.

या सर्व तक्रारींची दखल आमदार रामदास मसराम यांनी घेतली असून, सदर विषय त्यांनी थेट सहपालकमंत्री ड. आशिष जयस्वाल यांच्या समोर मांडला. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री जयस्वाल यांनी हा विषय अत्यंत गंभीर असून याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे स्पष्ट केले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, मग ते संस्था चालक असोत वा संबंधित शासकीय अधिकारी, असे त्यांनी ठणकावून सांगितले.तसेच, आमदार रामदास मसराम यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी (एसडीएम) यांना तत्काळ तपासणी करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बैठकीनंतर लगेचच आमदार मसराम व एसडीएम प्रधान यांनी खरेदी केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली असता, खरेदी केंद्राच्या वतीने कोंढाळा येथील लक्ष्मी राइस मिलच्या गोडाऊनमध्ये अनधिकृतरीत्या धान खरेदी सुरू असल्याचे आढळून आले.


तपासणीदरम्यान सदर गोडाऊनचा कोणताही वैध करारनामा नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच धानाची शास्त्रोक्त पद्धतीने मांडणी करण्यात आलेली नव्हती, वजनासाठी अधिकृत काटा उपलब्ध नव्हता आणि संस्थेकडे धान खरेदीबाबत कोणताही लेखी अथवा डिजिटल रेकॉर्ड नसल्याचेही निदर्शनास आले.या सर्व गंभीर बाबी लक्षात घेता, एसडीएम प्रधान यांनी आमदार रामदास मसराम यांच्या समक्ष आरमोरी सहकारी खरेदी विक्री संस्थाच्या वतीने सुरू असलेले लक्ष्मी राइस मिलचा गोडाऊन तात्काळ सील करण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे धान खरेदी प्रक्रियेत होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अशा अनियमिततेविरोधात कठोर पावले उचलली जातील, असेही यावेळी प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# 'अग्निकुंड' नभोनाट्याचे ध्वनिमुद्रण एफटीआयआय ९०.४ एफ.एम वरून होणार प्रसारण

दैनिक वादळ वार्ता
**हवेली । प्रतिनिधी**

रेडिओ एफटीआयआय स्टेशनच्या रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ या दिवशी नाटककार लेखक श्रीनिवास शारंगपाणी यांच्या 'अग्निकुंड' या नाटकावर आधारित नभोनाट्याचे ध्वनिमुद्रण करण्यात आले. ध्वनिमुद्रणाचे संपादन झाल्यावर लवकरच हे नभोनाट्य रेडिओ एफटीआयआयच्या ९०.४ एफ. एम. वाहिनीवरून प्रसारित करण्यात येईल.

या प्रसंगी लेखक-दिग्दर्शक, श्रीनिवास शारंगपाणी, रेडिओ एफटीआयआय स्टेशनच्या रेडिओ जॉकी नीता तुपारे आणि कलाकार उदय सुभेदार, नेहा सुभेदार, नेहा देशपांडे, तेजस्वी दळवी, मंदार लोहार, आशुतोष देऊसकर, अर्चना धर्माधिकारी, अक्षय आठवले तसेच सुशील मोरे हे उपस्थित होते. या सर्वांच्या उत्कृष्ट वाचाभिनयामुळे नभोनाट्याचे ध्वनिमुद्रण उत्तम रीतीने पार पडले, नभोनाट्याच्या दिग्दर्शनाची धुरा श्रीनिवास शारंगपाणी यांनीच सांभाळली तर निर्मिती सहाय्याची आणि कलाकार नियोजनाची जबाबदारी उदय सुभेदार यांनी व्यवस्थितपणे पार पाडली. नेहमीप्रमाणे नीता तुपारे यांनी आपल्या कौशल्याचा वापर करून नभोनाट्याचे ध्वनिमुद्रण संपन्न केले. विशेष म्हणजे सलगपणे चार तास न यांवता ध्वनिमुद्रण करणे म्हणजे एक कसोटीच होती पण त्यांनी ती संयमपूर्वक पार पाडली एवढेच नव्हे तर त्यांच्या अनुभवजन्य सूचनांचा सर्व कलाकारांना खूप उपयोग झाला. सर्व कलाकारांची सुद्धा ही कसोटीच होती कारण त्यांनीही सलगपणे वाचाभिनय सादर करून एक नवा मानदंडच प्रस्थापित केला.'अग्निकुंड' हे नाटक स्वार्थी आणि कपटी असलेल्या एका दांभिक देशभक्ताची कारस्थानं उघड करून त्याच्यामुळे ज्यांच्यावर अन्याय झाला होता त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या तरुण जोडीवर केंद्रित आहे. सर्व कलाकारांनी संहितेचा अभ्यास करून आपापल्या भूमिकेशी समरस होऊन वाचाभिनय सादर केला त्यामुळे श्रोत्यांना हे नभोनाट्य नक्कीच आवडेल असा विश्वास लेखक-दिग्दर्शक श्रीनिवास शारंगपाणी यांनी व्यक्त केला.यापूर्वी श्रीनिवास शारंगपाणी यांचे पॅलिंड्रोम' हे नाटक नभोनाट्य स्वरूपात रेडिओ एफटीआयआयने प्रसारित केलेले असून ते यूट्यूबवर रसिकांना ऐकता येईल. शारंगपाणी यांचेच 'काळे डग-पांढरे डग' हेही नाटक नभोनाट्य स्वरूपात रेडिओ एफटीआयआयने ध्वनिमुद्रित केलेले असून त्याचे संपादन चालू आहे. ते पूर्ण होताच तेही लवकरच प्रसारित केले जाईल असे आश्वासन नीता तुपारे मॅडम यांनी दिले.



# हिंद-दी-चादर शहिदी समागम कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

## कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी घेतला आढावा





दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणत्याही त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर आयुक्त फरोग मुकादम, उपायुक्त विजय म्हसाळ, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, रश्मी करंदीकर, नियोजन उपायुक्त प्रमोद केंभावी, या कार्यक्रमाचे राज्य समन्वयक उपजिल्हाधिकारी (रोहयो) रविंद्र राठोड यांच्यासह कोकण विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, महानगरपालिका, पोलीस विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जेएनपीए आणि सिडकोचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीव्दारे या बैठकीस उपस्थित होते. आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा-सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशस्वीततेसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी सुरू केली आहे. कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनासाठी शासकीय अधिकारी, गुरुद्वारा प्रशासन तसेच विविध समाजघटकांच्या सहभागातून तब्बल २५ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी केले. नागपूर व नांदेड येथे हा समागम यशस्वीरित्या पार पडला असून, खारघर येथे होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमासाठीही अत्यंत शिस्तबद्ध आणि सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी सर्व यंत्रणांना दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागाच्या मार्गदर्शनाखाली हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम कार्यक्रम समितीच्या तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव, वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथील कॉर्पोरेट पार्क मैदानावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हिंद दी चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमासाठी नवी मुंबईसह मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासह राज्यभरातून तसेच परदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय सेवा, स्वच्छता, भोजन, निवास, प्रसिद्धी, जलपुरवठा, विद्युत व्यवस्था आदी सर्व बाबींसाठी स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यानुषंगाने प्रशासनाव्दारे सर्वंकष तयारी करण्यात येत आहे.

# शारदा विद्या मंदिर, वरूड बु.येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

शारदा विद्या मंदिर, वरूड बु. येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. विश्वास भाऊ वाघ होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. डॉ. देविदासराव पाटील विराजमान होते. विशेष अतिथी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. गाढे सर, पर्यवेक्षक श्री. ए. बी. जाधव सर तसेच निवृत्त शिक्षक श्री. नामदेवराव पालकर सर उपस्थित होते.

इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्री. नाथ सर व सुसर सर तसेच इयत्ता नववीचे वर्गशिक्षक श्री. भोपळे सर व जगताप सर आणि दोन्ही वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या



विद्यार्थ्यांना निरोप दिला.

कार्यक्रमात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मुख्याध्यापक श्री. गाढे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषण डॉ. देविदास पाटील सर तसेच उद्घाटक श्री. विश्वास वाघ यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याची शपथ श्री. भोपळे सर यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी कु. पायल वाघ हिने आभार प्रदर्शन केले.

हा निरोप समारंभ भावनिक, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# खडक मांजरी येथे माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा तालुक्यातील खडक मांजरी येथे त्रिरत्न बौद्ध विहारामध्ये माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात व श्रद्धेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक समतेसाठी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याला प्रेरणा देणाऱ्या माता रमाई यांच्या कार्याला यावेळी अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस खडक मांजरीचे पोलिस पाटील गौतम वाघमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी माता रमाई यांच्या सामाजिक योगदानाला उजाळा दिला.या कार्यक्रमास शिवा संघटनेचे विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे, माजी उपसरपंच संतोष वाघमारे, ग्रामपंचायत



सदस्य आनंदा एडके, ज्येष्ठ नागरिक निवृत्ती वाघमारे, माजी ग्रामपंचायत सदस्य आत्माराम गायकवाड, ऑल इंडिया पँथर संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनाजी गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी गोवर्धन गणगोपले, युवा कार्यकर्ते विकास वाघमारे, उत्तमराव एडके, अनिकेत गायकवाड,श्याम कांबळे, विकास एडके, अंकुश वाघमारे, राहुल एडके यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी दीपक एडके यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर सविस्तर मनोगत व्यक्त केले. त्यांच्या संघर्षमय जीवनातून समाजाला मिळालेली प्रेरणा त्यांनी उपस्थितांसमोर मांडली.कार्यक्रमाच्या शेवटी पोलिस पाटील गौतम वाघमारे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थांचे आभार मानले. कार्यक्रम शांततामय व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# क्लास वन अधिकारी झाले श्री.रोहिदास जाधव सर

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आजच्या टेक्निकल युगामध्ये सर्व ऑनलाइनचे काम करू नही शिक्षकांनी प्रशासन क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. जिल्हा परिषद पीएम हायस्कूल मध्ये कार्यरत असलेले श्री.रोहिदास शेषराव जाधव सरांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण) या पदाला गवसणी घातली त्यांची राज्य शासनाच्या बहुजन कल्याण विभागात सहाय्यक संचालक पदी निवड झाली आहे. सविस्तर वृत्त असे की यवतमाळ



जिल्ह्यातील मांजर्डा येथील रहिवासी श्री.रोहिदास जाधव सर नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मागील वीस वर्षापासून सहाय्यक शिक्षक म्हणून कार्य करीत होते. सध्या ते वाई बाजार येथील शाळेत कार्यरत आहेत. अध्यापन कार्यासोबत स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. अभ्यासात सातत्य आत्मविश्वास, शिस्तबद्ध नियोजन यामुळे थेट त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर निवड झाली आहे.जाधव सरांचे अभिनंदन सर्व बंजारा समाजातील बांधवांच्या वतीने कौतुक व सत्कारही करण्यात येत आहे.

## पत्रकार राजेश ढोले धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित!

# ३४ वी धम्मपरिषद वटफळी तालुका नेर येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाला सन्मान सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**पुसद । प्रतिनिधी**

रिपब्लिकन वार्ता वृत्तपत्र व वृत्तवाहिनीचे विदर्भ उपसंपादक,तथा दैनिक सुवर्ण महाराष्ट्र पुसद तालुका प्रतिनिधी तसेच सामाजिक सांस्कृतिक,अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे पुसद तालुक्यातील लक्ष्मी नगर बोरगडी निवांसी उपा. राजेश मोतीराम ढोले सपत्नीक सहकुटुंब यांना महाबोधी बहुउद्देशीय संस्था अमरावती शाखा वटफळी यांच्या वतीने धम्मभूषण पुरस्कार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी ३४ व्या धम्म परिषद वटफळी तालुका नेर जिल्हा यवतमाळ येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार सन्मान सोहळा संपन्न झाला.या धम्मपरिषदेला विविध मान्यवर, देश विदेशातील भिक्खू संघ सामाजिक न्याय विभाग तथा महाबोधी बहुउद्देशीय संस्था अमरावती शाखा वटफळी यांचे प्रमुख मार्गदर्शक संस्थेचे अध्यक्ष भदंत डॉ. नागघोष महाथेरो, उपाध्यक्ष भदंत डॉ. हर्षबोधी



महाथेरो, पीएचडी पाली तथा बुद्धिझम व इतिहास एम फिल, संस्थेचे सचिव डॉ. एच आर धम्मदीप महाथेरो, अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मभूमी स्मारक महू मध्यप्रदेश इत्यादींच्या अध्यक्षतेखाली सन्मानपत्र व ट्रॉफी व देऊन सत्कार करण्यात आला.३४ व्या धम्म परिषदेचा आपल्या समाज बांधवास धम्मभूषण पुरस्कार मिळाल्याने पुसद तालुक्यातील समाजबांधव तथा इष्टमित्र परिवार तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मंडळी सदर पुरस्कार मिळाल्याने सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देशाला फलोत्पादनाची राजधानी बनवू शकणाऱ्या मयंक गांधींच्या सूचना केंद्र शासनासमोर ठेवणार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आपल्या देशाला महासत्ता करायचे असेल तर देशाचे शेतकरी आर्थिक सक्षम व्हावे लागतील. कृषिप्रधान आपल्या देशातील एकूण क्षेत्रापैकी केवळ १५% एवढीच फळबाग लागवड केली जाते. उत्तम दर्जाचे फळे देशातून निर्यात झाली पाहिजेत, शेतकऱ्यांना फळबाग लागवडीतून भरघोस आर्थिक उत्पन्न झाले पाहिजे. हा देश फळबाग लागवडीची राजधानी व्हावा हे जलनायक मयंक गांधी यांचे स्वप्न आहे. ते त्यांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने ग्लोबल विकास ट्रस्टचे चालेले कामकाज अतिशय उत्तम दर्जाचे आहे. ऋत्ढ चे हे मॉडेल देशासाठी उपयुक्त असून, देशाला फलोत्पादनाची राजधानी करण्याच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केंद्र शासनाच्या नियोजनात ठेऊ असे आश्वासन देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी दिले. ते कृषीकुल येथील महत्त्वपूर्ण नियोजन बैठकीत बोलत होते.

देशाच्या नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद हे दोन दिवसीय परळी वैजनाथ दौऱ्यावर आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल या आंतरराष्ट्रीय शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे फलोत्पादक शेतकरी, त्यांच्यासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना यासंदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस नीती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार, डॉ.हरिश्चंद्र वगे, माजी निवृत्त सनदी अधिकारी सुधी मोहंती, विवेक भारती, एकल फाउंडेशनचे दिवाकर झरबडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या अतिशय महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्र शासनाच्या धोरणातील शेतकऱ्यांविषयीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी भाग आहे. कापूस आणि सोयाबीन ही पारंपरिक पिकांना फाटा देत आता मोठ्या प्रमाणावर शेतकरी फळबाग लागवड करत आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अल्प दरात लागवडीसाठी रोपे आणि काढणी नंतर बाजारपेठेची उपलब्धतात याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. हे सर्व प्रयत्न वैश्विक पातळीवर करण्याजोगे आहेत. ऋत्ढ चे मॉडेल देशभर राबवता येण्यासारखे असल्याचे मत केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मागील शेतकरी संवाद मेळाव्यात हजारो शेतकऱ्यांच्या साक्षीने केले होते. देशाला जागतिक पातळीवर फलोत्पादनाची राजधानी बनवण्याचा जलनायक मयंक गांधी यांचा संकल्प आहे. त्यासाठीचे देशाचे धोरण अनुकूल असणे आवश्यक असल्याने आजच्या बैठकीत महत्त्वाची चर्चा घडून आली. या बैठकीत श्री.मयंक गांधी यांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन सर्व बाबींना मी केंद्र शासनासमोर ठेवेन अशी ग्वाही निती आयोगाचे सदस्य डॉ.रमेश चंद यांनी दिली.बैठकीनंतर परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांतून आलेल्या शेतकऱ्यांशी डॉ.रमेश चंद यांनी संवाद साधला. यावेळी नव्याने फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आणि -ण डारश्रश्र ऋळपरपलश बँकेच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. २५ शेतकऱ्यांना या कार्यक्रमात मदतीच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. केळी आणि तुती लागवड करणाऱ्या जवळपास २ हजार शेतकऱ्यांना मदत करण्याचे प्रमुख उद्दिष्ट ग्लोबल विकास ट्रस्टने डोळ्यासमोर ठेवले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077